
सत्यमेव जयते
न्याय विभाग
Department of Justice
भारत सरकार
Government of India

# संविधान दिन आणि नागरिकांचे कर्तव्य

## 26 नोव्हेंबर 2019 – 26 नोव्हेंबर 2020



"सरकारने राज्यघटनेकडे केवळ एक दस्तावेज म्हणून त्याचे अनुकरण केल्यास लोकशाहीला याचा त्रास होऊ शकतो, म्हणूनच राज्यघटनेच्या मुळापर्यंत पोहोचण्याची गरज आहे"


नरेंद्र मोदी
पंतप्रधान

## भारताची राज्यघटना

- भारतीय राज्यघटना हा एक पायाभूत कायदा आहे जो आपल्या देशाचा मुलभूत राजकीय आराखडा रेखाटतो. हा कायदा संसदीय लोकशाही आणि प्रजासत्ताक संघराज्याची रचना स्थापन करतो.
- भारतीय राज्यघटनेत आपल्या संस्थापकांची मुल्ये आणि दृष्टीकोनाचा समावेश आहे. हे त्यांच्या सामाजिक, राजकीय विचार आणि आर्थिक नीती, विश्वास तसेच इच्छांचे प्रतिनिधित्व करते.
- राज्यघटना प्रजासत्ताक भारताचे मुख्य अंग निश्चित करते. यामध्ये कार्यकारी, विधिमंडळ आणि न्यायव्यवस्था असून त्यांचे सामर्थ्य परिभाषित करून जबाबदाऱ्या निश्चित करते.
- भारतीय राज्यघटनेची महत्वाची वैशिष्ट्ये:
  - सरकारची संसदीय व्यवस्था
  - संघराज्याचा आराखडा
  - धर्मनिरपेक्ष राज्य
  - स्वतंत्र न्यायव्यवस्था
  - मूलभूत अधिकार आणि कर्तव्य
  - राज्य धोरणाचे प्रत्यक्ष तत्व
  - नागरिकत्व
  - प्रौढ मताधिकार
- भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वात मोठी आणि सर्वात तपशीलवार राज्यघटना आहे, अमेरिका, ब्रिटन, आयर्लंड, रशिया आदी देशांच्या राज्यघटनेपासून प्रेरणा घेऊन आपली राज्यघटना तयार करण्यात आली आहे.
- राज्यघटनेत 395 कलमं, 22 भाग आणि 12 परिशिष्टे आहेत.

"राज्यघटनेबद्दल जर सरळ सोप्या भाषेत मला सांगायचे असेल तर, आपली राज्यघटना भारतीयांचे महत्व आणि भारतीयांसाठी अखंडता या दोन्ही मुलमंत्राला साकार करते."

नरेंद्र मोदी
पंतप्रधान




इंराजिनि भारतनि संबिजिरनि केलिग्राफिक नमुनानि बिखं बिलाइ

संबिजिरनि गुबै पान्डुलिपिखौ बोरमा बिगुरनि बिलाइफोराव लिरदोंमोन जायनि बिबांआ 16x22 इन्चिमोन आरो बिनि जोरनायनि समा जौसे बोसोरमोन। जोबथारनाय पा

# संविधान सभा आणि घटनेची रचना

1946 ते 1949 या कालवधीत संविधान सभेद्वारा (1946 च्या कॅबिनेट मिशन योजने अंतर्गत स्थापित) भारतीय राज्यघटनेचा मसुदा तयार करण्यात आला. डॉ. राजेंद्र प्रसाद या मंडळाचे अध्यक्ष होते.

विधानसभेच्या 299 सदस्यांना (15 महिलांसह) घटनेचा मसुदा तयार करायला तीन वर्षांपेक्षा (1946-1949) कमी कालवधी लागला.

डिसेंबर 1946 ते नोव्हेंबर 1949 या कालावधीत विधानसभेच्या सदस्यांनी 11 बैठका घेतल्या.

घटनेचा मसुदा तयार करण्यासाठी विधानसभेने 29 ऑगस्ट 1947 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समिती स्थापन केली.



संबिजिर आइन आफादनि जुथुम्मा, दिसेम्बर 1946

"माननीय बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली भारताने सर्वसमावेशक घटनेचा मसुदा तयार केला. ही सर्वसमावेशक राज्यघटना म्हणजे नव भारताच्या निर्मिती संकल्पाचा आधार आहे. राज्यघटनेने आमच्यासाठी काही जबाबदाऱ्या आणल्या आहेत तसेच आमच्यासाठी काही मर्यादा देखील निश्चित केल्या आहेत."

नरेंद्र मोदी
पंतप्रधान

"राज्यघटना ही केवळ वकीलांसाठीचा दस्तावेज नाहीतर, हे जीवनाचे सुकाणू आहे आणि त्याचे चैतन्य अनंत काळासाठी आहे."

डॉ. बाबासाहेब आंबेडकर



डः बि.आर. आम्बेदकारनि सावगारि



केंद्रीय कैबिनेट के सदस्य भारत के संविधान पर हस्ताक्षर करते हुए। राजकुमारी अमृत कौर, डॉ. जॉन मथाई और सरदार वल्लभभाई पटेल चित्र में दिखाई दे रहे हैं।

26 नोव्हेंबर 1949 रोजी भारतीय राज्यघटनेचा अवलंब करण्यात आला आणि 26 जानेवारी 1950 पासून ती लागू केली. 1952 मध्ये नवीन संसदेची स्थापना होईपर्यंत या विधानसभेचे अस्तित्व संपुष्टात येवून त्याचे रुपांतर भारताच्या तात्पुरत्या संसदेत झाले. राज्यघटनेच्या मसुद्यावर चर्चा करताना विधानसभेने मांडलेल्या एकूण 7635 दुरुस्त्यांपैकी 2473 दुरुस्त्यांवर चर्चा करून ती निकाली काढण्यात आली.

299 सदस्यांपैकी, 284 सदस्यांनी प्रत्यक्षात राज्यघटनेवर स्वाक्षऱ्या केल्या.

विधानसभेने राज्यघटना निर्मितीच्या विविध कामांसाठी 13 समित्यांची नेमणूक केली. यापैकी 8 मुख्य समित्या होत्या आणि इतर किरकोळ समित्या होत्या.

विधानसभेच्या 8 मुख्य समित्यांची नावे

- मसुदा समिती
- केंद्रीय अधिकार समिती
- केंद्रीय राज्यघटना समिती
- प्रांतीय राज्यघटना समिती
- मुलभूत हक्क, अल्पसंख्यांक आणि वगळलेल्या क्षेत्रांची सल्लागार समिती
- प्रक्रिया समितीचे नियम
- राज्य समिती
- सुकाणू समिती



24 जानुवारि 1950 आव संबिजिर आइन आफादनि जुथुम्मा जोबथा जुथुम्मायाव सर्दार भल्लबभाइ पेटेल।

संविधान सभेने 22 जुलै 1947 रोजी राष्ट्रीय ध्वज आणि 24 जनवरी 1950 रोजी राष्ट्रगीत स्वीकारले.

आधुनिक भारतीय कलेचे प्रणेते श्री. नंद लाल बोस यांनी राज्यघटनेच्या प्रत्येक पानाच्या काठाची नक्षी तयार केली आणि कलात्मक तुकड्यांसह त्याला सुशोभित केले.

सुलेखन कला विशारद श्री. प्रेम बिहारी नारायण रेझादा यांनी एकहाती राज्यघटनेचे हस्तलिखित लिहिले आहे. हे काम पूर्ण करायला त्यांना 6 महिन्यांचा कालावधी लाग




संविधान सभा के सदस्यों की सामूहिक तस्वीर, 1950

## संविधान सभा आणि त्याचे प्रमुख सदस्य

कॅबिनेट मिशनच्या शिफारशींनुसार प्रांतीय विधान मंडळाद्वारे अप्रत्यक्ष निवडणुकीच्या माध्यमातून संविधान सभेच्या सदस्यांची निवड करण्यात आली. विधानसभेचे 299 सदस्य होते, त्यातील 229 सदस्य प्रांताचे आणि 70 राज्याचे प्रतिनिधित्व करतात.
विधानसभेच्या काही प्रतिष्ठीत सदस्यांची नावे:

| | | | | |
|---|---|---|---|---|
| डॉ. राजेंद्र प्रसाद | आसफ अली | बेगम ऐझाज रसूल | पद्मपत सिंघानिया | हरि सिं गौर |
| सरदार वल्लभभाई पटेल | श्यामा प्रसाद मुखर्जी | के. एम. मुन्शी | पुरुषोत्तमदास टंडन | पन्जाबराव एस. डेशमुख |
| जवाहरलाल नेहरू | हंसा मेहता | सर्वपल्ली राधाकृष्णन | सुचेता कृपलानी | रबि शंकर शुक्ला |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर | गोपीनाथ बोरडोलाई | अम्मू स्वामिनंदन | हसरत मोहानी | हरेक्रृष्ण मेहेताब |
| गोविंद वल्लभ पंत | हरेंद्र कुमार मुखर्जी | एम. अनंथसयानाम अय्यंगार | रफी अहमद किडवाई | एन्नि मास्कारिन |
| मौलाना अबुल कलम आझाद | बिनोदानंद झा | अल्लादी कृष्णस्वामी अय्यर | अनुग्रहनारायण सिन्हा | जिभराज नारायण मेहता |
| सरोजिनी नायडू | दुर्गाबाई देशमुख | बी. पट्टाभी सीतारामय्या | जगजीवन राम | मतुरि सत्यानारायणा |
| राजकुमारी अमृत कौर | फ्रॅंक अँथोनी | टी. प्रकाशम | सच्चिदानंद सिन्हा | दिप नारायण शिं |
| जे. बी. कृपलानी | जयपाल सिंग मुंडा | एन. संजीव रेड्डी | श्री कृष्ण सिन्हा | शार शयिद मुहाम्म्द शादुल्लाह |
| सी. राजगोपालचारी | हरगोविंद पंत | एस. निजलिंगप्पा | शेठ गोविंद दास | के. कामाराज |
| शरद चंद्र बोस | जॉन मथाई | जी. व्ही. मावळंकर | हरी सिंग गौर | पि. शुब्बारायण |



I beg to move, Sir,

"That it be resolved that:

(1) After the last stroke of midnight, all members of the Constituent Assembly present on this occasion do take the following pledge:

'At this solemn moment when the people of India, through suffering and sacrifice, have secured freedom, I, .............. a member of the Constituent Assembly of India, do dedicate myself in all humility to the service of India and her people to the end that this ancient land attain her rightful place in the world and make her full and willing contribution to the promotion of world peace and the welfare of mankind.'

(2) Members who are not present on this occasion do take the pledge (with such verbal changes as the President may prescribe) at the time they next attend a session of the Assembly."

संबिजिर आइन आफादनि सोद्रोमानि समाय खिरा।

# नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

आपल्या राज्यघटनेची आवश्यक वैशिष्ठे



"कर्तव्य चांगल्याप्रकारे बजावणे म्हणजे अधिकार"

**महात्मा गांधी**

नागरिकांच्या आणि मुलभूत कर्तव्यांविषयी अधिक जागरुकता आणण्यासाठी केंद्र सरकार सर्व नागरिकांपर्यंत पोहोचत आहे (26 नोव्हेंबर 2019 ते 26 नोव्हेंबर 2020). #itsmyduty

मुख्य उद्दिष्टे

- भारतीय नागरिकांना हे पुन्हा सांगायचे आहे की, ते भारतीय राज्यघटनेचे आणि त्यातील मूल्ये आणि तत्वांचे खरे रक्षणकर्ते आहेत.
- सर्व नागरिकांना त्यांचे सह नागरिक, समाज आणि राष्ट्राप्रती असलेल्या कर्तव्यांची जाणीव करून देणे.
- नागरिकांना राष्ट्रभावाच्या भावनेचा अभिमान बाळगण्यास प्रोत्साहित करणे.
- देशाबद्दल शिस्त आणि वचनबद्धतेची भावना वाढविण्यात मदत करण्यासाठी आणि राष्ट्र–उभारणीत नागरिकांची उर्जा एकवटणे.

# मुलभूत कर्तव्ये – महत्व आणि जोड

"मी माझ्या आईच्या मांडीवर माझी कर्तव्ये शिकलो. ती गावाकडील एक निरक्षर स्त्री होती...तिला माझा धर्म माहित होता. लहानपणापासूनच आपला धर्म काय आहे हे आम्ही शिकलो आणि त्यानुसार आपले आचरण करण्याचा प्रयत्न केला... कर्तव्य उत्तम प्रकारे बजावल्याने आपले हक्क सुरक्षित होतात. हे यातील सौंदर्य आहे. अधिकार कर्तव्यांपासून वेगळे करता येत नाहीत. त्यातूनच सत्याग्रहाचा जन्म झाला आहे, कारण माझे कर्तव्य काय आहे हे ठरविण्याचा मी नेहमीच प्रयत्न करत होतो."

**28 जून 1947 रोजी दिल्ली येथे प्रार्थना सभेत मूलभूत कर्तव्यांचे महत्व सांगताना महात्मा गांधी**

आपल्या राज्यघटनेत 11 मूलभूत कर्तव्ये समाविष्ट करण्यामागील महत्त्वाची कल्पना म्हणजे नागरिकांनी उपभोगलेल्या व्यापक हक्कांच्या बदल्यात नागरिकांच्या कर्तव्यांवर भर देणे.

**मूलभूत कर्तव्ये आदर, अभिमान, सहिष्णुता, शांतता, विकास आणि सुसंवाद या मुख्य मूल्यांवर लक्ष केंद्रित करतात.**

42 व्या घटना दुरुस्ती कायद्याद्वारे राज्यघटनेत, देशातील नागरिकांची मुलभूत कर्तव्ये तसेच नैतिक आणि बंधनकारक कर्तव्यांचा समावेश करण्यात आला.

**मूलभूत कर्तव्ये समाविष्ट करण्याची शिफारस करताना गठित समितीने मत व्यक्त केले होते की नागरिकांनी मूलभूत अधिकारांचा वापर करताना त्यांच्या कर्तव्याकडे दुर्लक्ष करू नये यासाठी पावले उचलणे आवश्यक आहे.**

86 व्या दुरुस्ती कायदा 2002 द्वारे, मुलांच्या शैक्षणिक संधींसंदर्भात 11 व्या मुलभूत कर्तव्याचा राज्यघटनेत समावेश करण्यात आला.

मूलभूत कर्तव्याची प्रेरणा यूएसएसआर, जपान आणि चीनच्या राज्यघटनांमधून प्राप्त झाली.

आपली मूलभूत कर्तव्ये भारतीय जीवनशैलीला चालना देण्यासाठी अविभाज्य कर्तव्यांचे एक संहिताकरण आहे. ते समाजाप्रती शिस्त आणि वचनबद्धतेची भावना प्रोत्साहित करतात.

मूलभूत कर्तव्ये प्रत्येक नागरिकाला सतत स्मरण करून देतात की राज्यघटनेने त्यांना विशिष्ट मूलभूत हक्क दिले आहेत, नागरिकांना लोकशाही वर्तनाचे काही मूलभूत नियम पाळणे देखील आवश्यक आहे कारण अधिकार आणि कर्तव्ये एकमेकांशी निगडीत आहेत.

"लोकशाही हा केवळ सरकारचा एक प्रकार नाही...आपल्या सहकाऱ्यांबद्दल आदर व्यक्त करण्याची ही एक वृत्ती आहे."

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

"प्रत्येक भारतीयाने आता हे विसरले पाहिजे की तो राजपूत आहे, शीख आहे किंवा जाट आहे. त्याने आता हेच लक्षात ठेवावे की तो भारतीय आहे आणि त्याला त्याच्या देशात प्रत्येक अधिकार आहे परंतु काही कर्तव्यांसह."

**सरदार वल्लभभाई पटेल**

नागरिकांची आणि मूलभूत कर्तव्ये केवळ सक्रीय सहभागातून आपली राष्ट्रीय उद्दिष्टे साकार करण्यास मदत करू शकतात.

ऑक्टोंबर 1999 मध्ये, न्यायाधीश वर्मा यांच्या अध्यक्षतेखालील समितीने , 'देशातील नागरिकांना मूलभूत कर्तव्ये शिकविण्याच्या सूचनांवरील' अहवाल सादर केला.

# नागरिकांच्या कर्तव्याबद्दल जागरूक रष

- 26 नोव्हेंबर 2019 रोजी ऑनलाईन प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी करा आणि MyGov.in वर त्वरित प्रमाणपत्र प्राप्त करा.
- शालेय मुले आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता पसरविण्यासाठी सहभागी व्हा.
- www.doj.gov.in वर उपलब्ध असलेली नागरिकांच्या मुलभूत कर्तव्यांविषयीची माहिती डाऊनलोड करा.

"तुम्ही किमान एक संकल्प करा आणि तुमची कर्तव्ये आणि देशाप्रती जबाबदाऱ्यांचा विचार करावा अशी तुम्हाला मी विनंती करतो. कर्तव्याच्या मार्गावर चालताना 130 कोटी प्रयत्न आणि 130 कोटी संकल्पांची ताकद देशासाठी बरेच काही करू शकतात."


**नरेंद्र मोदी**
**पंतप्रधान**
**स्वच्छ भारत दिवस 2019 निमित्त**

जोंखौ @DoJ_India आरो @MyGov आव फल  खालाम। #itsmyduty आव बाहागो ला

भारतनि संबिजिर आरो गाहाय बिबानफोरनि गासै फराखौ
http//legislative.gov.in/constitution-of-india पर देखें

न्याय विभाग
Department of Justice
भारत सरकार
Government of India
सत्यमेव जयते

# राज्यघटनेत अंतर्भूत केलेली 11 कर्तव्ये (भाग 4-A, कलम 51A)




आपल्या राज्यघटनेत जोडण्यात आलेली अतिरिक्त मूलभूत कर्तव्ये मानवाधिकारांच्या सार्वत्रिक घोषणेच्या कलम 29(1) सोबत संरेखित केले आहे.

"जेव्हा आपण जगाच्या नागरिकत्वाचे कर्तव्य पार पाडतो तेव्हा आपल्या जगण्याचा अधिकार प्राप्त होतो. हे एक मूलभूत विधान स्त्री आणि पुरुषाच्या कर्तव्याची व्याख्या करण्यासाठी आणि प्रत्येक अधिकाराचा संबंध पार पाडलेल्या कर्तव्याशी जोडण्यासाठी पुरेसे आहे."

**महात्मा गांधी**

मुलभूत कर्तव्ये आणि अधिकार एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

महात्मा गांधी म्हणाले होते, "कर्तव्याचा स्रोत योग्य आहे. जर आपण आपली कर्तव्ये बजावली तर अधिकार प्राप्त करणे फार कठीण नाही."

जोवर नागरिक त्यांच्या मूलभूत हक्कांना त्यांच्या मूलभूत कर्तव्यांची जोड देत नाहीत तोवर लोकशाही समाजात आपली पाळमूळ खोलवर रुजवू शकत नाही.

प्रत्येक अधिकारासोबत त्याचे संबंधित कर्तव्य देखील असते. एका नागरिकाने आपले कर्तव्य बजावले तर दुसऱ्या नागरिकाला त्याचा हक्क प्राप्त होतो.

जेव्हा आपण आपली कर्तव्ये पार पाडू तेव्हा आपण आपल्या अधिकारांसाठी पात्र ठरतो.